असा. क्र. २८

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जून ३०, २००३/आषाढ ९, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २००३

### अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५**

**क्रमांक जीईएन- १०२०००/१९०/प्र.क्र.९/नवि-२४.**---ज्याअर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) ( यापुढे ज्याचा उल्लेख 'नगरपरिषद अधिनियम' असा करणेत आला आहे) च्या कलम ३ चे पोट-कलम (३) आणि कलम ६ चे पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली व **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग एक-अ, पृष्ठ क्रमांक ७८ व १ दिनांक १६ ऑक्टोबर,२००१ व दिनांक १५ नोव्हेंबर,२००१ मध्ये प्रसिध्द झालेली शासकीय उद्घोषणा नगर विकास विभाग, क्रमांकः जीईएन- १०२०००/१९०/प्र.क्र.९/नवि-२४ दिनांक १६ ऑक्टोबर,२००१ आणि दिनांक १५ नोव्हेंबर,२००१ द्वारे महाराष्ट्र शासनाने अहमदनगर जिल्हातील अहमदनगर नगरपरिषद अधिक लहान नागरी क्षेत्र, हे अधिक लहान नागरी क्षेत्र असल्याचे बंद होईल असे जाहिर करण्याचा आपला इरादा जाहिर केला आहे;

आणि ज्याअर्थी, ही उद्घोषणा उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार अहमदनगर येथील दिनांक १८ नोव्हेंबर, २००१ व दिनांक २० नोव्हेंबर २००१ च्या 'दैनिक लोकमत' यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे व जिल्हाधिकारी, अहमदनगर तहसिलदार, अहमदनगर मुख्याधिकारी, अहमदनगर नगरपरिषद यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणामध्ये विहित केलेल्या कालावधीत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना महाराष्ट्र शासनाकडे कलम ३ च्या पोट-कलम (४) च्या तरतुदी अन्वये पाठविण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र शासनाने त्यावर योग्य प्रकारे विचार केला व दिनांक २३ नोव्हेंबर,२००१ रोजी महाराष्ट्र शासनासमोर उपस्थित असणा-या सर्वांना सुनावणी देण्यात आली. उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (५) मध्ये विहित केल्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती / सूचना विचारात घेतल्यानंतर त्यामध्ये तथ्य नसल्याबाबत राज्य शासनाचे समाधान झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६, पोट-कलम (१) च्या परंतुकाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने अहमदनगर नगरपरिषद यांचेशी विचार विनिमय केला आहे ;

आणि ज्या अर्थी सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक:४७५३/२००१, दिनांक २२.०४.२००३ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने शासन पत्र क्रमांक:जीईएन-१०२०००/ १९०/प्र.क्र.९/नवि-२४, दिनांक ०५.०५.२००३ अन्वये अहमदनगर नगर परिषदेशी परिणामकारक, वस्तुनिष्ठ रितीने व अर्थपूर्ण असा सल्ला मसलत करण्याच्या दृष्टीने कळविण्यात आले. त्यावर अहमदनगर नगरपरिषदेने ठराव क्र.१ दिनांक १२.०५.२००३ शासनास प्राप्त झाला. सदर ठरावाची शासन स्तरावरुन छाननी करण्यात आली.

आणि ज्याअर्थी, मा.सर्वोच्च न्यायालयातील स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) क्र.९९८३/२००३ मध्ये शासनाचे वतीने सादर केलेल्या निवेदनाचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने अहमदनगर जिल्हा परिषद आणि बुऱ्हाणनगर आणि नागरदेवळे महसूली गावांच्या ग्रामपंचायती यांच्याशी सल्लामसलत केली

आणि ज्याअर्थी , अहमदनगर लहान नागरी क्षेत्र हे अधिक लहान नागरिक क्षेत्र असल्याचे बंद होईल असे जाहीर करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनाला वाटते.

त्याअर्थी, आता मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या स्पेशल लिव्ह पिटीशन(सिव्हील) क्र. ९९८३/२००३ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ ( १९६५ चा महा.४०) च्या कलम ६ चे पोटकलम १ खंड (ड) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन या द्वारे अहमदनगर अधिक लहान नागरी क्षेत्र हे दिनांक ३० जून २००३ पासून नगरपरिषद क्षेत्र असल्याचे बंद होईल असे जाहिर करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सुभाष लाला,**
महाराष्ट्र शासनाचे सचिव

Scanned with OKEN Scanner

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २००३

### अधिसूचना

**मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम, १९४९**

**क्रमांक जीईएन-१०२०००/१९०/प्र.क्र.९/नवि-२४.**---ज्याअर्थी २००१ च्या जनगणनेच्या तात्पुरत्या आकडेवारीनुसार,अहमदनगर अधिक लहान नागरी क्षेत्राची (यांनतर ज्याचा निर्देश 'उक्त अधिक लहान नागरी क्षेत्र' असा करण्यात आलेला आहे.) एकुण लोकसंख्या ३,०७,४५५ इतकी आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ क्यू चा खंड (२) मध्ये पुढील घटक,

(अ) उक्त क्षेत्रातील लोकसंख्या.

(ब) उक्त क्षेत्रातील लोकसंख्येची घनता.

(क) उक्त क्षेत्रातील स्थानिक प्रशासनाला उपलब्ध होणारा महसूल.

(ड) उक्त क्षेत्रातील अकृषीक रोजगाराची टक्केवारी.

(इ) उक्त क्षेत्रातील आर्थिक महत्व व इतर घटक.

उपरोक्त नमूद केलेले घटक लक्षात घेऊन उक्त अधिक लहान नागरी क्षेत्र हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) (यापुढे ज्याचा 'उक्त अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे.) चे कलम ३ चे पोट-कलम (२) खाली 'अधिक मोठे नागरी क्षेत्र' असल्याचे जाहीर करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२) व पोट-कलम (२अ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि त्या अधिनियमाचे कलम ३ चे पोट-कलम (४) याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेऊन व दिनांक २३ नोव्हेंबर,२००१ रोजी महाराष्ट्र शासनासमोर उपस्थित झालेल्यांना सुनावणी दिली. तसेच सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक:४७५३/२००१, दिनांक २२.०४.२००३ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने शासन पत्र क्रमांक:जीईएन-१०२०००/१९०/प्र.क्र.९/नवि-२४, दिनांक ०५.०५.२००३ अन्वये अहमदनगर नगर परिषदेशी परिणामकारक, वस्तुनिष्ठ रितीने व अर्थपूर्ण असा सल्ला मसलत करण्याच्या दृष्टीने कळविण्यात आले. त्यावर अहमदनगर नगरपरिषदेने ठराव क्र.१ दिनांक १२.०५.२००३ हा ठराव पारित केलेला आहे. सदर ठरावाची शासन स्तरावरुन छानन्नी करण्यात आली.

आणि ज्याअर्थी, सर्वोच्च न्यायालयाचे स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) क्र.९९८३/२००३ मध्ये शासनाचे वतीने सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने अहमदनगर जिल्हा परिषद आणि बुऱ्हाणनगर आणि नागरदेवळे ग्रामपंचायतीशी सल्ला मसलत केली आहे.

आणि ज्याअर्थी , उक्त अधिसूचनेवरील प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचना आणि अहमदनगर नगरपरिषदेचा उक्त ठराव आणि उक्त अन्य स्थानिक प्राधिकरणाची मते यांचा विचार करता राज्य शासन अहमदनगर लहान नागरी क्षेत्राचे संपूर्ण स्थानिक क्षेत्र हे अधिक मोठे नागरी क्षेत्रासाठी उक्त कायदयानुसार महानगरपालिका असण्याचे घोषित करण्याची अधिसूचना विर्निदिष्ट करण्याचे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोटकलम (२) व पोटकलम (२अ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि मा. सर्वोच्च न्यायालयातील उक्त स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) च्या निर्णयाच्या अधीन राहून महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक ३० जून २००३ पासून अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर अधिक लहान नागरी क्षेत्र हे अहमदनगर अधिक मोठे नागरी क्षेत्र असल्याचे विनिर्दिष्ट करीत आहे व त्या क्षेत्राचे एक शहर होईल व त्याची उक्त अधिनिमयाच्या प्रयोजनासाठी "अहमदनगर शहर महानगरपालिका" या नावाने ओळखण्यात येणारी एक महानगरपालिका असेल ;

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सुभाष लाला,**
महाराष्ट्र शासनाचे सचिव

Scanned with OKEN Scanner

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २००३

### अधिसूचना

**मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम, १९४९**

**क्रमांक जीईएन- १०२०००/१९०/प्र.क्र.९/नवि-२४**.---ज्याअर्थी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) (यापुढे ज्याचा 'महानगरपालिका अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे.) च्या कलम ३, पोट-कलम (२) आणि (२) (अ) अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना नगर विकास विभाग, क्रमांकः **जीईएन-१०२००० /१९० /प्र.क्र.९ / नवि-२४** दिनांक १६ ऑक्टोबर,२००१ न दिनांक १५ नोव्हेंबर,२००१ च्या अधिसूचनेद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिक मोठया नागरी क्षेत्राची दिनांक ३० जून २००३ पासून अहमदनगर शहर म्हणून स्थापना करण्यात आलेली आहे व त्या क्षेत्राची अहमदनगर शहर महानगरपालिका म्हणून ओळखली जाणारी एक महानगरपालिका असेल ;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ४५२-अ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे अहमदनगर शहर-अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रभारी अधिकारी म्हणून अहमदनगर जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांची दिनांक ३० जून २००३ पासून नेमणूक करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सुभाष लाला,**
महाराष्ट्र शासनाचे सचिव

Scanned with OKEN Scanner

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032. dated the 30th June, 2003.

*Notification*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**No. GEN102000/190/CR-9/UD-24.**—Whereas by Government Proclamation, Urban Development Department, No. GEN 102000/190/C.R.9/UD-24, dated the 16th October, 2001 read with the Proclamation of even number dated 15th November 2001, (hereinafter referred to as "the said Proclamations"), published in the Maharashtra Government Gazette, Extraordinary, Part-I A, Central Sub-section, dated the 16 October 2001 and the 15th November 2001, respectively, issued in exercise of the powers conferred by sub-section (3) of section 3 read with sub-section (2) of section 6 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), (hereinafter referred to as "the said Act") the Government of Maharashtra announced its intention to declare that the existing Ahmednagar Smaller Urban Area of Ahmednagar Municipal Council in Ahmednagar District, shall cease to be a Smaller Urban Area;

And whereas, the said Proclamation was published in the Daily Lokamat, Ahmednagar on the 18 November, 2001 and the 20 November 2001 and also by displaying the same on the notice boards in the offices of the Collectors, Tehsildar, and Chief Officer, Municipal Council, situated at Ahmednagar as required under sub section (3) of section 3 of the said Act;

And whereas, objections and suggestions to the said proposal which were received by the Collector of Ahmednagar within the period prescribed in said Proclamation and forwarded to the Government of Maharashtra as per sub section (4) of section 3 of the said Act, were duly considered and hearing was also given to those who appeared before the Government of Maharashtra on the 23rd November 2001 and as provided in sub section (5) of section 3 of the said Act, after considering the objections and suggestions, the Government of Maharashtra was satisfied that objections and suggestions raised are not sufficient and valid;

And whereas, Ahmednagar Municipal Council has been consulted by the Government of Maharashtra as required by the proviso to sub-section (1) of section 6 of the said Act;

And whereas, as per the direction in W.P. No.4753 of 2001, given by the Honourable Bombay High Court, Aurangabad Bench, Government has sent letter No.102000/190/ CR-9/UD-24 dated the 5th May 2003 in order to have effective, real and meaningfully consultation with Municipal Council, Ahmednagar;

And whereas, the Ahmednagar Municipal Council has passed a resolution No. 1 dated the 12th May 2003 and forwarded the same to the Government and the Government has considered the same;

And whereas, in pursuance of the submissions made by the Learned Counsel for the State Government in the Hon'ble Supreme Court in S.L.P. (C) No. 9983 of 2003, the Government of Maharashtra has consulted the Ahmednagar Zilla Parishad and the Village Panchayats for the Revenue Villages of Burhannagar and Nagar Devale;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to declare that the local area comprising the whole of Ahmednagar smaller urban area shall cease to be a Municipal area;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (d) of sub-section (1) of section 6 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Township Act, 1965 (Mah. XL of 1965), and subject to the final decision of the Hon'ble Supreme Court in the said SLP, the Government of Maharashtra hereby declares that the whole of the local area comprising the Ahmednagar smaller urban area shall cease to be a municipal area with effect from 30th June, 2003.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUBHASH LALLA
Secretary to Government

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032. dated the 30th June, 2003.

*Notification*

BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

No. GEN 102000/190/CR-9/2000/UD-24.—Whereas, the population of the Ahmednagar Municipal Council comprising of the Ahmednagar Smaller Urban Area, District Ahmednagar, according to the provisional census figures for the Census of the year 2001 is 3,07,455;

And whereas, the Government of Maharashtra, having regard to the following factors , namely:-

(i) the population of the area;

(ii) the density of the population therein;

(iii) the revenue generated for local administration;

(iv) the percentage of employment in non- agricultural activities;

(v) the economic importance,

and other factors mentioned in clause (2) of article 243-Q of the Constitution of India, has proposed to issue a notification in exercise of the powers conferred by sub-sections (2) and (2A) of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949), declaring the Ahmednagar Smaller Urban Area to be a larger urban area and for which the Municipal Corporation of the City of Ahmednagar would be constituted;

And whereas, after previous publication of the draft notification as required by sub-section (4) of section 3 of the said Act; and objections and suggestions received in respect of the said proposal were considered;

And whereas, the Government of Maharashtra, in accordance with the directions issued by the Honourable Bombay High Court, in Writ Petition No.4753 of 2001, and in order to have a effective, real and meaningful consultation with the Ahmednagar Municipal Council, issued a letter no. GEN 102000/190/CR-9/2000/UD-24 dated the 05/05/2003 requesting the said Municipal Council to consider the said proposal and accordingly after considering the said proposal the said Council has passed the resolution No.1, dated the 12th May 2003;

And whereas, in pursuance of the submissions made by the Learned Counsel for the State Government in the Hon'ble Supreme Court in S.L.P. (C) No. 9983 of 2003, the Government of Maharashtra has consulted the Ahmednagar Zilla Parishad and the Village Panchayats for the Revenue Villages of Burhadnagar and Nagar Devale;

And whereas, after considering the objections and suggestions received pursuant to the said draft notification and the said resolution of the Ahmednagar Municipal Council and the views of the said other local authorities, the State Government considers it expedient to issue a notification declaring the entire local area of the Ahmednagar Smaller Urban Area to be a larger urban area for which a municipal corporation under the said Act will be constituted;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (2) read with sub-section (2A) of section 3 of the said Act and subject to the final decision of the Hon'ble Supreme Court in the said SLP, the Government of Maharashtra, hereby, specifies, the -30th June, 2003, to be date from which the whole of the Ahmednagar smaller urban area, District Ahmednagar shall be a larger urban area, which shall form a city having a Corporation by the name "Municipal Corporation of the City of Ahmednagar.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUBHASH LALLA
Secretary to Government

Scanned with OKEN Scanner

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 30 th June, 2003.

*Notification*

BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

No.GEN 102000/190/CR-9/UD-24.—Whereas, by Government Notification, Urban Development Department, No. GEN 102000/190/CR-9/UD-24, dated the 30th June 2003 issued under sub-section (2) and (2A) of section 3 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949) (hereinafter referred to as "the said Act"), the larger urban area specified therein has been constituted to be a city of Ahmednagar, with effect from 30th June 2003, which shall have a Municipal Corporation to be known as the Municipal Corporation of the city of Ahmednagar;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 452-A of the said Act, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby appoints, with effect from the 30th June 2003, the Collector of Ahmednagar District, as an officer in-charge to exercise all the powers and duties of the Municipal Corporation of the City of Ahmednagar.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUBHASH LALLA
Secretary to Government

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner